**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२४ । सोमवार १ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# प्राजक्त तनपुरे यांचा भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल

## सभापती राम शिंदे, पालकमंत्री विखे यांची उपस्थिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाजपमध्ये नुकताच प्रवेश केलेले माजी मंत्री प्राजक्त प्रसाद तनपुरे यांनी आज, सोमवारी विधानपरिषद निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून चर्चेत असलेल्या नावांपैकी कोणीही उमेदवारी दाखल केली नाही, श्रीरामपूरचे माजी आमदार दिवंगत जयंत ससाणे यांचे पुत्र करण ससाणे हे महाविकास आघाडीकडून इच्छुक होते. त्यांनी शनिवारी आपला अपक्ष अर्जही दाखल केलेला आहे. आज शेवटच्या दिवशी मात्र तनपुरे वगळता कोणीही अर्ज दाखल केला नाही. त्यमुळे महाविकास आघाडीकडून ससाणेंना पुरस्कृत केले जाण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या वाटेवर असलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी शनिवारी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्या विधानपरिषदेच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले होते. काल, रविवारी रात्री उशिरा भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी महाराष्ट्रातील दहा उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यात अहिल्यानगरमधून प्राजक्त तनपुरे यांना अपेक्षेप्रमाणे भाजपची उमेदवारी जाहीर झाली.

उमेदवारी अर्ज भरण्याची आज, सोमवारी अंतिम मुदत होती. आज सकाळी प्राजक्त तनपुरे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पंकज आशियाँ यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी तनपुरेंसमवेत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पारनेरचे आमदार काशिनाथ दाते सर, संगमनेरचे आमदार अमोल खताळ आदी उपस्थित होते.



विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून प्राजक्त तनपुरे यांनी आपला उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याकडे दाखल केला यावेळी विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आमदार काशिनाथ दाते आमदार अमोल खताळ आदी उपस्थित होते. (छाया – राजु खरपुडे, नगर)

### जगताप समर्थकांमध्ये नाराजी

विधानपरिषदेचे माजी आमदार दिवंगत अरुणकाका जगताप यांनी दोनवेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. त्यांचे गेल्या वर्षी निधन झाल्यानंतर त्यांच्या जागी ज्येष्ठ पुत्र जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप हे राष्ट्रवादीकडून इच्छुक होते. तशी त्यांनी जोरदार तयारीही चालवली होती. परंतु राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या दरम्यान राजकीय घडामोडी घडून प्राजक्त तनपुरे यांचे नाव पुढे आले व ते भाजपचे उमेदवार झाले. त्यामुळे जगताप समर्थकांमध्ये नाराजी आहे. तनपुरेंचा उमेदवारी अर्ज दाखल करताना शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्यासह राष्ट्रवादीचे सर्वच नगरसेवक अनुपस्थित होते. त्यामुळे जगताप समर्थकांची ही नाराजी उघडपणे दिसून आली.

# छत्रपती संभाजीनगरमधील खून प्रकरणातील आरोपींना नेवासा पोलिसांकडून अटक

## गुप्त माहितीच्या आधारे मोठी कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** छत्रपती संभाजीनगर येथील सिडको पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका व्यक्तीची निर्घृण हत्या करून फरार झालेल्या दोन मुख्य आरोपींना जेरबंद करण्यात नेवासा पोलिसांना मोठे यश आले आहे. नेवासा पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून ही कारवाई केली असून, अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी सिडको पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरमधील सिडको पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३५५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) प्रमाणे दिनांक ३० मे २०२६ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी हत्या केल्यानंतर घटनास्थळावरून फरार झाले होते.

**गुप्त माहिती ठरली दिशादर्शक**

हे आरोपी नेवासा पोलीस स्टेशनच्या हद्दीत आले असल्याची गोपनीय माहिती नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना मिळाली. माहिती मिळताच कोणतीही दिरंगाई न करता पोलीस निरीक्षकांनी तातडीने आरोपींच्या शोधासाठी एक विशेष पोलीस पथक रवाना केले नेवासा पोलीस स्टेशनची कारवाई पोलीस पथकाने कौशल्यपूर्ण तपास करत नेवासा पोलीस स्टेशन हद्दीतून खालील दोन मुख्य **आरोपींना ताब्यात घेतले:**

१) प्रसन्नजित प्रमोद हिवाळे (वय २० वर्षे, रा. मुकुंदवाडी सिडको एन–२, छत्रपती संभाजीनगर) २) अरुण पदमसिंग भुल (वय १९ वर्षे, रा. एन–७ ■ पान ४ वर

सावेडी उपनगरात रविवारी रात्री वादळी वाऱ्याने

# झाडे पडली, तारा तुटल्या, वीज गायब, घरांचे नुकसान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रविवारी रात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड पाईपलाईन रोड परिसरात सोसाट्याच्या वाऱ्यासह तासभर झालेल्या पावसाने सर्वत्र पाणी पाणी झाले. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेच्या तारा तुटल्या वाऱ्याचा वेग इतका होता की मुळासह मोठमोठे वृक्ष कोसळली. घरांवरील पत्रे उडून गेले. अंगणात असलेली झाडे घरावरच पडल्याने अनेकांचे नुकसान झाले.

वसंत टेकडी येथील श्री विनय पाऊलबुधे यांच्या घराजवळीत मोठमोठे वृक्ष मुळासह उन्मळून पडली यामध्ये शेडचे मोठे नुकसान झाले. नगर छत्रपती – संभाजी नगर रोडवरील विजेचे तारा तुटल्याने काही ठिकाणी खांब वाकले. सकाळपासून महानगरपालिका व वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर तारा जोडणे, झाडे ■ पान ४ वर

# गुन्हेगारी मोडीत काढणार, चांगल्या कामांना प्राधान्य देणार- विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे

## केंद्रीय पत्रकार संघाकडून आयजी संजय येनपुरे यांचा विशेष सन्मान

**कमलेश गायकवाड**
**दैनिक आकर्षण**

**नाशिक–** 'पोलीस दलाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तींना समूळ मोडीत काढणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. पोलीस प्रशासन नेहमीच चांगल्या आणि सकारात्मक कामांना प्राधान्य देईल,' अशी ग्वाही नाशिक परिक्षेत्राचे नवनियुक्त विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी दिली.



केंद्रीय पत्रकार संघाच्या वतीने आयोजित एका विशेष कार्यक्रमात आयजी संजय येनपुरे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या आगामी कार्यपद्धतीची दिशा स्पष्ट केली.

**माणसातील देव म्हणून गौरविले**

केंद्रीय पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आयजी संजय येनपुरे यांच्या आजवरच्या कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील कार्यपद्धतीचा गौरव केला. ''येनपुरे साहेब हे केवळ एक उत्तम अधिकारी नसून, संकटात धावून जाणारे माणसातील देव आहेत,'' अशा शब्दांत पत्रकार संघाने त्यांच्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या या संवेदनशीलतेमुळेच सर्वसामान्य जनतेचा पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**विश्लेषण आणि महत्त्वाचे मुद्दे:**

गुन्हेगारीवर कडक प्रहार: नाशिक परिक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुन्हेगारी टोळ्या आणि अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत आयजी येनपुरे यांनी दिले आहेत.

सकारात्मकतेला प्राधान्य: ■ पान ४ वर

१००० कोटींच्या कर्ज प्रकरणाबाबत ठाकरे शिवसेनेचे जागतिक बँकेला पत्र

# मनपाच्या सार्वजनिक मालमत्ता गहाण न ठेवता नगरसेवक-अधिकाऱ्यांच्या मालमत्ता गहाण घ्या - किरण काळे

## ...तर ते अमरधामही गहाण ठेवायला मागेपुढे पाहणार नाहीत, किरण काळेंचा घाणाघात । नगरसेवकांच्या मालमत्ता तारण घेण्याची ठाकरे शिवसेनेची जागतिक बँकेकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रस्तावित सुमारे १००० कोटी रुपयांच्या कर्जप्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने थेट जागतिक बँकेकडे धाव घेतली आहे. महानगर प्रमुख किरण काळे यांनी जागतिक बँकेच्या भारतातील देश संचालकांना सविस्तर पत्र पाठवून कोणतेही कर्ज मंजूर करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीची, मागील पाणी योजनांची आणि लेखापरीक्षण अहवालांची सखोल पडताळणी करण्याची मागणी केली आहे. पत्राची प्रत मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना देखील पाठविण्यात आली आहे. हजार कोटींच्या कर्जासाठी वेळप्रसंगी सत्ताधारी अमरधामही गहाण ठेवायला मागेपुढे पाहणार नाहीत, असा घाणाघात काळेंनी केला आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, महानगरपालिकेने यापूर्वी फेज–१, फेज–२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांवर एकूण सुमारे ३०० कोटी रुपये खर्च केले आहेत. मात्र एवढा खर्च होऊनही शहरातील अनेक भागांमध्ये आजही एक दिवसाआड किंवा तीन–चार दिवसांनी ■ पान ४ वर

### मनपाची आर्थिक स्थिती चिंताजनक

पत्रात महानगरपालिकेची आर्थिक स्थितीही चिंताजनक असल्याचा दावा करण्यात आला आहे. नियमित खर्च, कर्मचारी वेतन, विकासकामांतील मनपाचा हिस्सा आणि ठेकेदारांची देणी याबाबत आर्थिक अडचणी असल्याचे नमूद करत अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात कर्ज उचलणे धोकादायक ठरू शकते, असे म्हटले आहे.तसेच मागील दहा वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, पाणी योजनांवरील खर्च, मालमत्तांची प्रत्यक्ष पडताळणी आणि आर्थिक क्षमता तपासल्याशिवाय कोणतेही कर्ज मंजूर करू नये, अशी विनंती ठाकरे शिवसेनेने जागतिक बँकेला केली आहे.

### त्या नगरसेवक, अधिकाऱ्यांच्या प्रॉपर्टी तारण घ्या :

यासोबतच ठाकरे शिवसेनेने एक धक्कादायक पण ठळक मागणीही केली आहे. महानगरपालिकेची मालमत्ता ही जनतेची मालमत्ता असल्याने कर्जासाठी ती तारण ठेवू नये. त्याऐवजी कर्ज मंजुरीच्या ठरावावर स्वाक्षरी करणारे नगरसेवक, प्रशासकीय अधिकारी आणि या कर्जाला पाठिंबा देणारे लोकप्रतिनिधी यांनी वैयक्तिक जबाबदारी स्वीकारावी व आवश्यक असल्यास त्यांच्या वैयक्तिक मालमत्ता तारण घेण्यात याव्यात, अशी मागणी पत्रात करण्यात आली आहे. निवडणुकांमध्ये उमेदवार मत खरेदीसाठी कोट्यावधी रुपये वाटतात. आलिशान गाड्यांमधून फिरतात. सत्तेच्या माध्यमातून पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावरती माया गोळा केली जाते. अनेकांकडे बेहिशोबी संपत्ती आहे. सर्वसामान्य करदात्या नगरकर, व्यापारी, उद्योजकांच्या गळ्याला फास लावण्या ऐवजी राजकीय नेत्यांच्या मालमत्ता यासाठी तारण घेतल्याशिवाय कर्ज देऊच नये, असे ठाकरे शिवसेनेचे मत असल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

# गोदावरी–कृष्णा खोरे कार्यालय स्थलांतराला कर्मचाऱ्यांचा तीव्र विरोध

## कार्यालये हलविण्याचा निर्णय शेतकरी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींसाठी गैरसोयीचा; मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवून आदेश रद्द करण्याची मागणी । अहिल्यानगर जलसिंचन भवनासमोर कर्मचाऱ्यांचे कामबंद करुन निदर्शने; आदेश रद्द करण्याची राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांनी कामबंद ठेऊन विरोध दर्शविला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने स्थलांतराला विरोध दर्शविण्यासाठी सोमवारी (दि. १ जून) जलसिंचन भवनासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात जलसंपदा विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच कार्यालयांचे स्थलांतर तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले.




या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय तोडमल, देविदास पाडेकर, वैशाली बोडखे, मृदुला भोर, उषा देवकाते, गंगासागर उगले, अनिता निकाळजे, अश्विनी कोंडा, शुभांगी लवांडे, पल्लवी सोनवणे, प्रतीक्षा औटी, स्नेहल राऊत, राधा चौधरी, संजीवनी गायकवाड, अश्विनी भगत, दीपा सातपुते, प्रियंका म्हस्के, शिल्पा ताजणे, पल्लवी तोडमल, अश्विनी देवराय, संगीता कार्ले, दीपक गीते, रवींद्र कोडम, रोहित निमसे, प्रसाद कराळे, प्रशांत आठरे, मनोज देशमुख, राजेश जाधव, संतोष गांगर्डे, किशोर गांगर्डे, कृष्णा आंधळे, आदिनाथ कराळे, रवींद्र तवळे, दत्ता सावरे, संतोष कासार, पोपट जायभाय, जालिंदर सुपेकर आदींसह जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जलसंपदा विभागांतर्गत कार्यान्वित असलेल्या सर्व सिंचन महामंडळांच्या कामकाजावर शासन स्तरावरून नियंत्रण ठेवले जाते. महामंडळ स्तरावरील महत्त्वाचे निर्णय शासनाच्या मान्यतेनंतरच निर्गमित होत असतात. मात्र शासन व जलसंपदा विभागाची पूर्वमान्यता न घेता संबंधित महामंडळांकडून विविध कार्यालयांच्या स्थलांतराचे आदेश काढण्यात आल्याची बाब चिंताजनक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

संघटनेच्या मते, प्रस्तावित स्थलांतरामुळे प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असून शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे. अनेक वर्षांपासून कार्यरत असलेली कार्यालये अचानक अन्यत्र हलविणे हे कोणत्याही दृष्टीने योग्य नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेने विशेषतः अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाच्या ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### हजरत सय्यद अहमदशहा अकबरशाह (रहे.) उर्फ कोळगाववाले बाबा यांचा संदल व ऊरुस

अहिल्यानगर - सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत सय्यद अहमदशहा अकबरशाह (रहे.) उर्फ कोळगाववाले बाबा यांचा संदल व ऊरुस दरवर्षीप्रमाणे यावर्षी दि. ३ व ४ जून रोजी होत आहे. या कार्यक्रमासाठी संयोजक मंडळाकडून जय्यत तयारी सुरू असून, कोणत्याही भाविकाची गैरसोय होणार नाही, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. बुधवार दि. ३ जून रोजी संदल व गुरुवारी दि. ४ रोजी ऊरुस होत आहे. यानिमित्त ४ जूनला रात्री ९ वा. मशहूर कव्वाल हैदर नाजा व तौसिफ जुनैदी यांच्या सुश्राव्य कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. याच दिवशी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले असून याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे करण्यात आले आहे. कोळगाववाले बाबा यांच्या संदल व ऊरुस आणि कव्वाली व महाप्रसाद अशा सर्व धार्मिक कार्यक्रमांचा सर्वधर्मिय भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे सर्व विश्वस्त, मुजावर व ऊरुस समिती आणि कोळगाव गावकर्यांतर्फे करण्यात आले आहे.

### अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने खेळाडूंचे वाढदिवस साजरे

अहिल्यानगर - मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुले बुद्धिबळ स्पर्धेत केवळ बुद्धिबळाच्या चुरशीच्या लढतीच नव्हे, तर खेळाडूंसाठी आपुलकीचे वातावरणही अनुभवायला मिळत आहे. स्पर्धेच्या कालावधीत ज्या खेळाडूंचे वाढदिवस होते, त्यांचा अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते पेढे भरवून सत्कार करण्यात आला. यामुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी देशातील विविध राज्यांमधून तसेच परप्रांतातून स्पर्धे साठी आलेल्या खेळाडूंचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमुळे विविध भागांतील खेळाडूंना एकमेकांशी संवाद साधण्याची, अनुभवांची देवाणघेवाण करण्याची आणि मैत्रीपूर्ण वातावरणात खेळण्याची संधी मिळते.स्पर्धे चे यशस्वी आयोजन करण्यासाठी पारुनाथ ढोकळे, संजय सपकाळ, प्रकाश गुजराथी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, प्रशांत धगेकर, देवेंद्र ढोकळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व स्वयंसेवक परिश्रम घेत असून त्यांच्या प्रयत्नांमुळे स्पर्धेचे नियोजन सुरळीतपणे पार पडत आहे. बुद्धिबळप्रेमी आणि पालकांकडूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

### आनंदऋषीजीमधील सूक्ष्म व्यायामाव्दारे मोफत मणके विकार उपचारांचा रूग्णांना मोठा लाभ

अहिल्यानगर- विविध कारणांमुळे अनेकांना पाठीचे, मणक्यांचे विकार जडत असतात. अशा मणके विकारांवर राष्ट्रसंत आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील आनंदऋषीजी ब्लड बँकेत सूक्ष्म व्यायाम पद्धतीव्दारे मोफत उपचारांची कायमस्वरुपी व्यवस्था कार्यान्वीत आहे. याठिकाणी आता दि १ जून २०२६ पासून दररोज सकाळी ९ ते १० यावेळेत सूक्ष्म व्यायाम पध्दती उपचार मार्गदर्शन केले जाणार आहे. आतापर्यंत ७०० हून अधिक रूग्णांना या उपचारांनी आराम मिळाला आहे. स्व. श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रूणवाल (विजापूर, कर्नाटक) परिवार या उपक्रमासाठी योगदान देत आहे. मणक्यात गॅप पडणे, गादी सरकणे, नियमित पाठ व कंबर दुखी, पूर्ण पाय दुखणे, हातापाय बधिर होणे, मान अवघडणे, हातापायात मुंग्या येणे अशी लक्षणे आढळणाऱ्या रूग्णांना सूक्ष्म व्यायाम करून चांगला आराम मिळू शकतो. सतत एका जागेवर बसून राहणे, संगणकाचा अति वापर, जास्त वेळ एका जागी उभे राहणे, पोटावर

# महिलांच्या सक्षमीकरणा करीता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची प्रेरणा - पालकमंत्री विखे




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महिलांच्या सक्षमीकरणा करीता केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केलेल्या योजना मागे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची प्रेरणा असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती दिनाच्या निमिताने मंत्री विखे पाटील यांनी पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या मुख्य कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर शहराचे अध्यक्ष अनिल मोहिते याप्रसंगी उपस्थित होते.

धर्म रक्षणाबरोबरच जनकल्याण आणि स्त्री सन्मानाला अहील्यादेवी होळकर यांचे प्राधान्य होते.महीला अर्थिक दृष्ट्या सक्षम झाल्या पाहीजेत या उद्देशाने महेश्वर येथे कुशल विणकरांच्या माध्यमातून हातमाग व्यवसायाला पाठबळ दिले.ही केवळ वस्त्रनिर्मीती नव्हती तर महीलांचा स्वाभीमान रोजगार आणि आत्मनिर्भरतेची सुरूवात होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात योजनांच्या माध्यमातून सुरू झालेल्या महीलांच्या सक्षमीकरणाच्या कार्यामागे अहील्यादेवीच्या विचारांची प्रेरणा असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकराने महीलांकरीता मोठ्या प्रमाणात योजना सुरू केल्या.अहील्यानगर जिल्ह्यात शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. परंतू त्यापुढे जावून एकल महिलांना पाठबळ देण्यासाठी सुरू झालेल्या योजनेमुळे एकल महीलांना कौशल्या प्रशिक्षणाच्या संधी मिळाल्या आहेत.अनेक महीलांचे प्रशिक्षण पूर्ण होवून त्यांना रोजगार निर्माण झाला.आशा पध्दतीची योजना सुरू करणारा अहील्यानगर जिल्हा एकमेव असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

तिर्थक्षेत्रांच्या विकासाचा एक आदर्श अहील्यादेवीनी आपल्या कारकिर्दीत निर्माण केला.मंदीराचा जिर्णोध्दार घाटांचा विकास विहीरीची निर्मिती ही देशाच्या सांस्कृतिक परंपरेची प्रतिक असून जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचे उतम उदाहरण ठरले आहे.यातुन देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेला बळकटी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तिनशेव्या जयंतीच्या निमिताने जलसंपदा विभागाच्या वतीने अहील्यादेवीच्या विचारांची प्रेरणा घेवून काढण्यात आलेली गोदा ते नर्मदा जलयात्रा धर्म संस्कृती आणि पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी होती.यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश मधील सांस्कृतिक परंपरेचा वारसा अधिक घट्ट झाला आहे.

# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश नाईक यांचा पोलीस मुख्यालयात सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पोलीस दलामध्ये तब्बल ३५ वर्षे प्रामाणिक, निष्ठावान व कर्तव्यदक्ष सेवा बजावून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झालेले श्री. प्रकाश मुरलीधर नाईक यांचा पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमात सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते श्री. नाईक यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते.

मूळचे गुंडेगाव, ता. नगर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असलेल्या श्री. प्रकाश मुरलीधर नाईक यांनी पोलीस दलात ३५ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी



महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि जनसेवा यांचा आदर्श निर्माण केला.

सेवानिवृत्तीनिमित्त उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील आयुष्यासाठी निरोगी, आनंदी व समृद्ध जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.

# बीडच्या बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रावर शिक्षकाची नोकरी मिळवल्याचा आरोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासनाची दिशाभूल करून कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे ८० टक्के प्रकल्पग्रस्ताचा दाखला मिळवून शिक्षक सेवक पदाचा लाभ घेतलेल्या शिक्षकाला तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, तसेच शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. या प्रकरणात ठोस कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

समितीने दिलेल्या निवेदनानुसार, सध्या आलेगाव अंतर्गत हनुमानवाडी जिल्हा परिषद शाळा, ता. श्रीगोंदा येथे कार्यरत असलेल्या एका शिक्षकाने इतर मागास प्रवर्गातील ८० टक्के प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊन शिक्षक सेवक पद मिळविले. मात्र, ते प्रत्यक्षात प्रकल्पग्रस्त नसताना कथितपणे बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र मिळवून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सदर शिक्षकाचे कुटुंबीय हे मूळचे भांडगाव (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी असून त्यांची वडिलोपार्जित मालमत्ता व जमिनीची नोंद तेथे आहे. असे असताना त्यांनी २००९ मध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बीड यांच्याकडे अर्ज करून आपण बीड जिल्ह्यातील कळसंबर गावातील सर्व्हे क्रमांक ३४१ मधील जमीनधारक असल्याचे दर्शविले. संबंधित जमीन पाझर तलाव प्रकल्पासाठी संपादित झाल्याचा दावा करत त्यांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळविल्याचे समितीचे म्हणणे आहे.

# अनिष्ट प्रथांना छेद देत अहिल्यादेवींनी उभारले आदर्श राज्यकारभार – अतुल फलके

**निमगाव वाघा येथे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी**
**विद्यार्थ्यांना इतिहासातून प्रेरणा घेण्याचे आवाहन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाउंडेशन ट्रस्ट आणि भुसारे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींच्या जीवनकार्याची माहिती देऊन त्यांच्या विचारांचा आदर्श अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याला व कर्तृत्वाला उजाळा देत समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, भुसारे कोचिंग क्लासेसच्या संचालिका सुषमा भुसारे, युवराज भुसारे, बाळू डोंगरे, जयसिंग गायकवाड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतुल फलके म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजातील अनेक अनिष्ट प्रथा, रूढी आणि परंपरांना धैर्याने छेद देत लोककल्याणकारी राज्याची निर्मिती केली. महिलांना सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. राज्यकारभार करताना त्यांनी जनतेच्या अडचणी समजून घेत त्यांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले. त्यांच्या प्रशासनात न्याय, पारदर्शकता आणि लोकहिताला सर्वोच्च महत्त्व होते.

ते पुढे म्हणाले की, अहिल्यादेवींनी देशभरातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला, नदीघाट बांधले, धर्मशाळा उभारल्या आणि जनतेच्या सोयीसाठी विविध विकासकामे केली. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी उभारलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

सुषमा भुसारे यांनी सांगितले की, समाजहितासाठी परिवर्तन घडवून आणण्यात अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांनी महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या अधिकारांसाठी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील जुनाट आणि अनिष्ट रूढी–परंपरांना फाटा देत स्त्री सक्षमीकरणाचा मार्ग त्यांनी दाखवून दिला. त्यामुळेच त्या आजही महिला सक्षमीकरणाच्या प्रेरणास्थान मानल्या जातात.

# अनुसूचित जाती अबकड उपवर्गीकरण विरोधात सकल चर्मकार समाज आळंदी येथे एकवटला

**राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा ; विजय घासे यांचा शासनाला इशारा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीय समाजातील आरक्षणाचे अ–ब–क–ड उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आणला असून या निर्णयाला महाराष्ट्रातील सकल चर्मकार समाजाकडून तीव्र विरोध व्यक्त करण्यात येत आहे. या उपवर्गीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रभरात जनजागृती व प्रचार–प्रसार करण्याचा निर्धार मुख्य प्रवर्तक विजय घासे यांनी नुकत्याच झालेल्या आळंदी येथील राज्यव्यापी बैठकीत व्यक्त केला. शासनाच्या प्रस्तावामुळे अनुसूचित जातींमध्ये संभ्रम निर्माण होत असून समाजात तेढ वाढविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

चर्मकार समाजाचे म्हणणे आहे की, शासनाने हे उपवर्गीकरण धोरण नेमके काय आहे, याचा समाजावर काय परिणाम होईल, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समाजासमोर मांडलेली नाही. कोणताही अभ्यास, सखोल चर्चा किंवा समाज



बांधवांचे मत जाणून न घेता शासन हा निर्णय घाईत लागू करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. त्यामुळे समाजामध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

या उपवर्गीकरणामुळे मागासवर्गीयांच्या सुमारे ५९ जातींमध्ये आरक्षण विभाजन करण्याचा प्रयत्न सुरू असून, यामुळे मांग, महार, चांभार यांसारख्या समाजांमध्ये फूट पाडण्याचा कट असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. सामाजिक ऐक्य धोक्यात आणणारे आणि समाजविरोधी ठरणारे हे धोरण असल्याचे आरोप समाजाकडून करण्यात आले.

# आरोग्य जपण्यासाठी शुद्ध खाद्यतेलांचा वापर काळाची गरज- आमदार संग्राम जगताप

**डोळसे नॅचरल ऑईल्सच्या 'लाईव्ह ऑईल शॉप'चे उत्साहात उद्घाटन । शुद्ध, पारंपरिक आणि आरोग्यदायी तेलांची ग्राहकांना थेट उपलब्धता**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी परिसरातील धर्माधिकारी मळा येथे डोळसे नॅचरल ऑईल्सच्या 'लाईव्ह ऑईल शॉप'चा उद्घाटन समारंभ आमदार संग्राम जगताप यांच्याहस्ते संपन्न झाला. कोल्ड प्रेस घाण्यावर पारंपरिक पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या विविध खाद्यतेलांच्या विक्रीसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना शुद्ध, भेसळमुक्त आणि आरोग्यदायी तेल सहज उपलब्ध होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी नगरसेवक बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, नगरसेविका वंदना ताठे, माजी नगरसेवक दगडुमामा पवार, भेय्या पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर उपस्थितांनी लाईव्ह ऑईल मशीनची पाहणी करत तेल निर्मिती प्रक्रियेची माहिती घेतली. करडई तेल, शेंगदाणा तेल, सूर्यफूल तेल, तीळ तेल, मोहरी तेल, जवस तेल, खोबरेल तेल आणि बदाम तेल आदी विविध प्रकारची तेल उत्पादने येथे थेट ग्राहकांसमोर तयार करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''आजच्या काळात आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून खाद्यपदार्थांमधील भेसळीमुळे अनेक आजार वाढत आहेत. अशा परिस्थितीत पारंपरिक कोल्ड प्रेस पद्धतीने तयार होणारे शुद्ध तेल नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. डोळसे परिवाराने सुरू केलेला हा उपक्रम



केवळ व्यवसाय नसून समाजाच्या आरोग्याशी निगडित एक महत्त्वपूर्ण सेवा आहे.'' त्यांनी स्थानिक उद्योजकांनी अशा नाविन्यपूर्ण आणि दर्जे दार व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही केले.

पुढे आपल्या बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, ''ग्रामीण आणि पारंपरिक पद्धती जपून आधुनिक ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्याचे काम डोळसे नॅचरल ऑईल्स करीत आहे. आज लोक पुन्हा नैसर्गिक आणि सेंद्रिय उत्पादनांकडे वळत आहेत. अशा वेळी विश्वासार्हता आणि गुणवत्ता जपणारे उद्योग समाजासाठी प्रेरणादायी ठरतात. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीबरोबरच आरोग्यदायी जीवनशैलीला चालना देण्याचे काम या माध्यमातून होणार आहे.'' त्यांच्या भाषणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

डोळसे नॅचरल ऑईल्सचे संचालक लक्ष्मणराव डोळसे यांनी सांगितले की, ''ग्राहकांना शुद्ध आणि नैसर्गिक तेल मिळावे, या उद्देशाने आम्ही हा उपक्रम सुरू केला आहे. कोल्ड प्रेस पद्धतीमुळे तेलातील पोषक घटक टिकून राहतात आणि आरोग्यासाठी फायदेशीर तेल ग्राहकांना मिळते. ग्राहकांचा विश्वास आणि समाधान हेच आमचे सर्वात मोठे बळ असून गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही.'' त्यांनी उपस्थित मान्यवरांचे आणि ग्राहकांचे आभारही मानले.

समारंभास लक्ष्मणराव डोळसे, अर्जुन डोळसे, दिपाली डोळसे, सूर्यकांत ससाने, प्रसाद शिंदे, निलेश गिरमे, मंथन चव्हाण, धनंजय भोज, कृष्णा डोळसे, अशोक डोळसे, विशाल धोत्रे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण होते. उद्घाटनानंतर अनेकांनी लाईव्ह तयार होणाऱ्या तेलांची खरेदी करत या उपक्रमाचे स्वागत केले.

सावेडी येथील धर्माधिकारी मळा, पंपिंग स्टेशनजवळ, छोटू महाराज थिएटर समोर सुरू करण्यात आलेले हे 'लाईव्ह ऑईल शॉप' परिसरातील नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत असून शुद्ध आणि पारंपरिक खाद्यतेलांच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारा हा उपक्रम म्हणून त्याकडे पाहिले जात आहे. कार्यक्रमाचे प्रास्तविक अर्जुन डोळसे यांनी केले तर स्वागत दीपाली डोळसे यांनी केले

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### चापडगावात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे जल्लोषात स्वागत; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



अहिल्यानगर - उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांचे कर्जत तालुक्यातील चापडगाव येथे आज उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त चौंडी येथे आयोजित कार्यक्रमासाठी जात असताना हा स्वागत सोहळा पार पडला.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवती प्रदेशाध्यक्षा कु. संध्या सोनवणे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या स्वागत कार्यक्रमात स्थानिक महिला कार्यकर्त्या, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. महिलांनी पुष्पगुच्छ देऊन सुनेत्रा पवार यांचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी सुनेत्रा पवार यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधत त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. त्यांच्या आगमनामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महिलांनी त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याबद्दल सकारात्मक भावना व्यक्त केल्या. स्वागत कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होता. चापडगाव परिसरात घोषणाबाजी, स्वागत फलक आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

### प्रा. महेश पाडेकर यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या राज्य कार्याध्यक्षपदी नियुक्ती



अहिल्यानगर- पर्यावरण रक्षण आणि वृक्ष संवर्धनाच्या कार्यात अग्रगण्य असलेल्या निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (महाराष्ट्र राज्य) च्या राज्य कार्याध्यक्षपदी प्रा. महेश मंदा विष्णू पाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समाजमनावर व शिक्षकांवर अधिराज्य गाजवणारा,शिक्षण क्षेत्रातील ध्येयवेडे व्यक्तिमत्व असलेल्या प्रा. पाडेकर यांच्या निवडीमुळे या पर्यावरण चळवळीला आता अधिक वैचारिक धार प्राप्त होणार आहे. लेखणीच्या सामर्थ्यातून पर्यावरण जागृती. पाडेकर यांनी समाजात प्रबोधनाचे अनेक कार्य उभे केले आहे. पर्यावरणदृष्टीकोनातून ते पर्यावरणाचे प्रश्न समाजासमोर मांडणार आहेत. ''पर्यावरण संवर्धन ही केवळ घोषणा नसून ती काळाची गरज आहे आणि ती लोकचळवळ बनवणे हे माझे ध्येय आहे,'' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. शिक्षक आणि समाजधुरीणांसाठी नवी प्रेरणाशिक्षण आणि पर्यावरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रा. पाडेकर यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील हजारो शिक्षक आणि पर्यावरण प्रेमींना एक नवी दिशा मिळणार आहे. मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. प्रमोद मोरे यांनी प्रा. पाडेकर यांच्यावर विश्वास व्यक्त करताना नमूद केले की, त्यांच्या निष्ठेमुळे संस्था निश्चितच नवनवीन शिखरे गाठेल. वृक्षारोपण नाही, वृक्ष संवर्धन महत्त्वाचे केवळ झाडे लावण्यापेक्षा ती जगवणे आणि त्यांच्या वाढीकडे लक्ष देणे याला प्रा. पाडेकर प्राधान्य देणार आहेत. त्यांच्या या नवीन कार्यकाळात (२०२६ ते २०२९) ते पर्यावरणाशी संबंधित कल्पक उपक्रम आणि जनजागृती मोहिमा राबवणार आहेत. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या या महत्त्वपूर्ण ध्येयाला आता प्रा. पाडेकर यांच्या अनुभवाची साथ मिळाल्याने पर्यावरण क्षेत्रात एका नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे, असेच म्हणावे लागेल. या निवडीबद्दल अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त सन्माननीय वैभवराव पिचड,विश्वस्त गिरीजाजी जाधव,अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, प्राचार्य डॉ.भास्करराव शेळके, उपप्राचार्य चांगदेव डोंगरे,पर्यवेक्षक विवेककुमार वाकचौरे, सुनील टिक्कल, डॉ.अनिल धिवर,मुख्यध्यापक संघटना कार्याध्यक्ष विलास सावंत,सामाजिक कार्यकर्ते अजित जगधने, शिक्षक भारती संघटना सर्व पदाधिकारी सदस्य आदींनी अभिनंदन केले.

# जायकवाडी धरणात पोहण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा बुडून मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** छत्रपती संभाजीनगर येथील मुकुंदवाडी परिसरातील सात युवक रविवारी (दि. ३१) जायकवाडी धरण परिसरात पोहण्यासाठी आले असता दुर्दैवी घटना घडली. पोहत असताना दोन युवक पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

मृतांमध्ये अनिकेत मनू भारती (वय १९, रा. अंबिका नगर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) आणि संकेत सिद्धार्थ खरात (वय १८, रा. अंबिका नगर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) यांचा



समावेश आहे. दोघेही शिक्षण घेत होते.

सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक, स्थानिक पोहणारे तसेच संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. शोधमोहीमेदरम्यान संकेत खरात याचा मृतदेह प्रथम पाण्यातून बाहेर काढण्यात आला.

त्यानंतर सुरू ठेवलेल्या शोधकार्यात रात्री उशिरा अनिकेत भारती याचाही मृतदेह सापडला. त्यामुळे या दुर्घटनेत दोन्ही युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

या हृदयद्रावक घटनेमुळे मुकुंदवाडी परिसरात शोककळा पसरली असून दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्काराने अनिस कुरेशी यांचा सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत न्यूज सुपर वन ''सत्याचा बुलंद आवाज'' तसेच दैनिक लोकपत्रचे प्रतिनिधी अनिस कुरेशी (छत्रपती संभाजीनगर) यांची राज्यस्तरीय ''महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' साठी निवड करण्यात आली.

नाशिक येथे दि. ३० मे रोजी आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते



अनिस कुरेशी यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, जनहिताचे विषय प्रभावीपणे मांडणे आणि लोकांपर्यंत सत्य माहिती पोहोचविण्याच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या गौरवामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार आणि मित्रपरिवाराकडून अनिस कुरेशी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## साईदीप हिरोज व एसकेबी संघांचा दणदणीत विजय; अंतिम फेरीत धडक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील वाकोडी परिसरातील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या १२ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेत शनिवारी रंगतदार उपांत्य सामने खेळविण्यात आले. दोन्ही सामन्यांत खोडूंच्या उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजीचा थरार पाहायला मिळाला.

पहिल्या उपांत्य सामन्यात टॉपर्स क्रिकेट अकॅडमी व साईदीप हिरोज यांच्यात लढत झाली. प्रथम फलंदाजी करत साईदीप हिरोज संघाने २५ षटकांत ५ बाद १३९ धावांचा भक्कम डोंगर उभारला. संघाकडून आदित्य इथापे याने शानदार फलंदाजी करत ७५ धावांची दमदार खेळी साकारली.

विजयासाठी १४० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या टॉपर्स क्रिकेट अकॅडमी संघाला साईदीप हिरोजच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरता आला नाही. संपूर्ण संघ १७.१ षटकांत अवघ्या ४१ धावांवर गारद झाला. त्यामुळे साईदीप हिरोज संघाने तब्बल ९८ धावांनी दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. उत्कृष्ट फलंदाजीबद्दल आदित्य इथापे याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात आर एल अकॅडमी व एसकेबी संघ आमनेसामने आले.



प्रथम फलंदाजी करत आर एल अकॅडमी संघाने ९ गड्यांच्या मोबदल्यात ११६ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात एसकेबी संघाने आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन करत १८.२ षटकांत १ बाद ११८ धावा पूर्ण केल्या आणि ९ गडी राखून सहज विजय मिळवला. संघाकडून धनंजय जरे याने ४१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या स्पर्धेमुळे लहान वयोगटातील क्रिकेटपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत असून क्रिकेटप्रेमींमध्येही स्पर्धेबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त हरदिनचे वृक्षारोपण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच अध्यात्म, समाजप्रबोधन आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ह.भ.प. पूजाताई आळकुटे-माने यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्ववान महिला गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात छावणी परिषदेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रमेश साके यांच्या सेवानिवृत्तीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, विजय माने, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, माधवी माळगे, मीनाताई परदेशी, रजनी ताई परदेशी, प्रांजली सपकाळ, शितलताई भापसे, जहीर सय्यद, रमेश वराडे, सर्वेश सपकाळ, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, अनिल हळगावकर, अभिजीत सपकाळ, जालिंदर आळकुटे, मुन्ना वाघस्कर, निजाम पठाण, नवनाथ वेताळ, विलास आहेर, मनोहर दरवडे, ओम माळगे, सुधीर कपाळे, दीपक घोडके, अविनाश जाधव, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, सरदारसिंग परदेशी, राजू जंगम, शशिकांत पवार, दशरथ मुंडे, योगेश चौधरी, कुमार धतुरे, प्रकाश देवळालीकर, विनोद खोत, दीपक बडदे, सुनील बग्गन, विशाल भामरे, नवनाथ खराडे, बाळासाहेब धाडगे, विजय महाजन, सेंट्रल बँकेचे अमित देशमुख, शितल भापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बनावट गोळीबार प्रकरणाचा छडा लावणाऱ्या पोलीस दलाचा शिवसेनेकडून गौरव

### सत्य समोर आणणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा विशेष सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानासमोर घडलेल्या कथित गोळीबार आणि हल्ला प्रकरणाचा पर्दाफाश करून फिर्यादीच या कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचे उघड करणाऱ्या पोलीस दलाचा शिवसेनेच्या वतीने गौरव करण्यात आला. पोलीस अधीक्षक कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक जगदिश भांबळ, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्यासह तपास पथकातील अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, शहरप्रमुख संभाजी कदम, नगरसेवक दत्तात्रय कावरे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, शंकर शेळके, अशोक शेळके, सागर गलांडे, शिवराज गलांडे, प्रवीण गीते यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानासमोरील गोळीबार आणि हल्ला प्रकरणाने काही दिवसांपूर्वी शहरात खळबळ उडवून दिली होती. मात्र, पोलीसांनी अत्यंत बारकाईने आणि तांत्रिक तपासाच्या आधारे या प्रकरणाची उकल केली. तपासादरम्यान फिर्यादी चिरंजीव गाढवे यानेच स्वतः वर हल्ला घडवून आणण्यासाठी सुपारी देत बनावट गुन्ह्याचा कट रचल्याचे निष्पन्न झाले




आहे. या कटामागे युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांना गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न असल्याचेही तपासात समोर आले. मात्र, पोलीसांच्या निष्पक्ष आणि सखोल तपासामुळे सत्य बाहेर आले आणि हा कथित कट उधळून लावण्यात यश आले. याबद्दल शिवसेनेच्या वतीने पोलीस दलाचे आभार व्यक्त करण्यात आले.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलीस पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल नितिन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुरज वाबळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुमित गवळी, शाकीर सय्यद, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, सतिष शिंदे, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड आणि भागवत बांगर यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले की, गोळीबार आणि हल्ल्याचा बनाव करून शिवसेनेच्या पदाधिकाऱ्याला अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, पोलीस प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता निष्पक्ष तपास करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणली. शहरात खोटे गुन्हे दाखल करण्याची मालिका सुरू असून, या घटनेच्या उलगड्यामुळे अशा प्रवृत्तींना काही प्रमाणात आळा बसणार आहे.

ते पुढे म्हणाले की, शहरातील काही ठरावीक हॉस्पिटल आणि डॉक्टरांकडून किरकोळ भांडणांमध्येही गंभीर जखमीचे प्रमाणपत्र दिले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे अनेक वेळा खोटे गुन्हे दाखल होण्यास मदत मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला. अशा प्रकारांचा शिवसेनेच्या माध्यमातून पर्दाफाश करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले म्हणाले की, शहरात अनेकदा एखाद्या व्यक्तीवर दबाव आणण्यासाठी किंवा त्याला अडकविण्यासाठी खोटे गुन्हे दाखल केले जातात. कोणत्याही निरपराध व्यक्तीवर अन्याय होऊ नये, यासाठी पोलीस यंत्रणा सजगपणे काम करत आहे.

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धेचा राजस्थानचा अरुण कटारिया विजयी तर उपविजेता रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा २७ मे ते ३१ मे या दरम्यान पाच दिवस लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेच्या विजेत्यांना जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पाच लाख रु रोख रक्कम प्रोत्साहन म्हणून देण्यात आली. यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, स्पर्धेचे पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल टापसे, अमरीश जोशी, शिशीर इंदुरकर, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धंगेकर, विशाल गुजराथी, चेतन कड, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, कौस्तुभ ठोंबरे, रोहिणी आडकर, डॉ. स्मिता वाघ, संजय खडके, नवनीत कोठारी आदीसह खेळाडू पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धे



ला देशभरातून २७५ पेक्षा जास्त बुद्धिबळ खेळाडू सहभागी होते. सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवले. अनेक रोमहर्षक व उत्कंठा पूर्ण डाव नगर करांना पाहता आले. या स्पर्धेत १४० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू सहभागी झाले होते. ही या स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. आपल्या भाषणात नरेंद्र फिरोदिया म्हणाले की देशभरातील नामांकित बुद्धिबळ कुठून या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून अवघ्या साडेपाच वर्षाच्या बाल बुद्धिबळपटू पासून ते ९२ वर्षीय जेष्ठ खेळाडू पर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावलेले आहे. अहिल्यानगर मध्ये प्रथमच इतक्या मोठ्या स्तरावरील फिडे रेडींग स्पर्धा होत आहे बुद्धिबळाचा प्रसार आणि प्रचार वाढवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून शंभर चेस बोर्ड खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे आमचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून उत्कृष्ट खेळाडू घडवणे हा आहे यंदा रशियन ग्रँडमास्टर यांना बोलावून विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा खेळाडूंना मोठा फायदा झाला असल्याची भावना व्यक्त केली तर संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविकार सांगितले की या स्पर्धेचे प्रमुख आकर्षक म्हणजे रशियन ग्रँडमास्टर यांचा सहभाग त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेला ऊर्जा अधिक उंचावला आहे विशेष म्हणजे यांनी एकाच वेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना खेळून उपस्थित त्यांची मने जिंकली स्पर्धा पाच दिवस चालली या पाच दिवसांमध्ये अनेक खेळाडूंनी उत्कृष्टपणे खेळ खेळले असल्याची भावना व्यक्त केली.

या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे.

मुख्य पारितोषिक प्रथम- अरुण कटारिया, द्वितीय- रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव, तृतीय- श्रीराज भोसले, चतुर्थ-किशन कुमार, पाचवे- विराज राणे, सहावे- श्रीवास्तव राघव, सातवे- प्रशांत नाईक, आठवे- युधार्थ नरुले, नववे- कबनूरकर ऋषिकेश, दहावे- बी आर अरविंद, अकरावे- हरिकेश चव्हाण, बारावे- सुजल लंबोरे, तेरावे- आर्यन चक्रबोरते, चौदावे- शुभम चांडक, पंधरावे- रुपेश पाडवे.

बेस्ट १८०० बीलो. प्रथम-अनय महामुनी, द्वितीय- नीली पुनीत, तृतीय- सार्थक भापकर, चतुर्थ- मनोज कुमार, पाचवे- श्याम अवघड.बेस्ट १६०० बीलो.प्रथम- कोहिनूर भुवन, दृतिय- प्रदीयोत मिश्रा, तृतीय- अर्णव इवना, चतुर्थ- आयुष ठोंबरे, पाचवी- करवा व्यंकटेश.अन रेटेड कॅटेगिरी.

# अहिल्यादेवींच्या आदर्शाने शेतकरी, जनतेसाठी काम - एकनाथ शिंदे

## चौंडीत अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सोहळा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केंद्र व राज्य सरकारने जनतेच्या विकासासाठी अनेक योजना आणल्या. चौंडीच्या विकास आराखड्यानुसार विकासकामाला सरकार निधी पैसे कमी पडु देणार नाही. आम्ही जिल्ह्याचे अहिल्यानगर नामकरण केले. आपले सरकार जनतेचे, सर्वसामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांच्या पाठिशी आम्ही उभे आहेत. कर्जमाफी करत आहोत. अहिल्यादेवीच्या आदर्शनाने महिला सक्षमीकरणासाठी काम करत आहोत असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी (ता. जामखेड) येथे रविवारी (ता. ३१) जयंती सोहळा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्राताई पवार, विधानपरिषद सभापती राम शिंदे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, माजीमंत्री अण्णासाहेब डांगे, खासदार रामराव वडकुते, आमदार सुरेश धस,गोपीचंद पडळकर,मोनिका राजळे,नारायण पाटील, बाबासाहेब देशमुख, उत्तम जानकर ,सचिन कांबळे,काशिनाथ दाते, हेमंत ओगले,सुनील कर्जतकर,किरण लहामटे, अक्षय कर्डीले,अमोल खताळ, विठ्ठलराव लंघे, माजी आमदार रामहरी रुपनवर , भीमराव धोंडे, पोपटराव गावडे, स्नेहलता कोल्हे, यांच्यासह जिल्हाभरातील पदाधिकारी पदाधिकारी व राज्यभरातून नागरिक उपस्थित होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, अटकेपार झेंडा फडकवणारे महान योद्धे, अहिल्यादेवींनी कुळाचे नाव सार्थक केले. त्याग, न्यायप्रिय, स्त्रीशक्तीचे प्रतीक, युगप्रवर्तक आहेत. त्यांनी मानवता धर्म जपला. कौंटूबिक आघात सहन करुनही त्यांनी कार्य थांबवले नाही. केंद्र व राज्य सरकारने जनतेच्या विकासासाठी अनेक योजना आणल्या. चौंडीच्या विकास आराखड्यानुसार विकासकामाला सरकार निधी पैसे कमी पडु देणार नाही. आम्ही जिल्ह्याचे अहिल्यानगर नामकरण केले. आपले सरकार जनतेचे, सर्वसामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांच्या पाठिशी आम्ही उभे आहेत. महिला सक्षमीकरणासाठी काम करत आहोत. अहिल्यादेवीच्या आदर्शनाने काम करत आहोत. कर्जमाफीचे दिलेले अश्वासन पुर्ण करत आहोत. गोदा ते नर्मदा यात्रा सुरु केली. मुंबई- पुणे रस्त्यावर शिंगरोबाचे स्मारक उभारणार आहोत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, अहिल्यानगर होळकर यांनी अठ्ठावीस वर्ष राज्यकारभार केला. हुंडाबंदी, महिलांचे जीवन समृद्ध करण्यासाठी काम केले. काशी, आयोद्धा, पंढरपुर, तुळजापुर आदी देशभरातील धार्मिक स्थळाचा जिर्नोद्धार केला, घाट बांधले. अहिल्यादेवीने स्वतः च्या तिजोरीतून खर्च केला. समाजाच्या कल्याणासाठी काम केले म्हणून त्या लोकमाता ठरल्या. गरिबांनी रोजगार मिळवून दिला. महिला सैनिकांची स्वतंत्र तुकडी निर्माण करणाऱ्या पहिल्या महिला आहेत. चरित्र, कार्य आणि आदर्श तीनशे वर्षांनंतरही तेवढेच प्रेरणादायी आहे. चौंडीच्या विकासासाठी सरकारने पुढाकार घेतला येथील काम दर्जेदार, चांगली व्हावीत. त्यांच्या जीवनावर आधारीत चित्रपटातून त्याचे कार्य जगात पोचले जाणार आहे. अहिल्यादेवीच्या कार्यावर बोलतानाच दादांची आठवण काढत सुनेत्राताई भावुक झाल्या. राज्यात दुष्काळमुक्तीसाठी आम्ही काम करणार आहोत.

**दिलेली अश्वासन पुर्ण केली : देवेंद्र फडणवीस**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (ता. ३०) व रविवारी (ता. ३१) असे दोन दिवस चौंडी (ता. जामखेड) य़ेथे विविध कार्यक्रम झाले.

# ६ जून रोजी दुर्गराज रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा : ऐतिहासिक सोहळ्याला देशभरातून प्रतिसाद

## ऐतिहासिक सोहळ्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील मावळ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दुर्गराज रायगड, ५ व ६ जून २०२६ - रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा भव्य सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. राज्याभिषेक सोहळा समितीच्या संयोजनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे यांनी दिली.

या सोहळ्याच्या निमित्ताने 'धार तलवारची, युद्धकला महाराजांची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' आणि 'सोहळा पालखीत, स्वराज्याच्या ऐश्वर्यात' यासारख्या विशेष कार्यक्रमांची सादरीकरणे होणार आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण पुन्हा उभा राहणार असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे दर्शन घडणार आहे.

या कार्यक्रमात छत्रपती संभाजी महाराज व युवराजकुमार शाहाजीरेज छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे ठळक आकर्षण :- ऐतिहासिक मिरवणुका आणि पालखी सोहळा, विविध सांस्कृतिक आणि शाहिरी कार्यक्रम, शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिके, महाराष्ट्रातील आणि देशभरातील शिवप्रेमींचा मोठा सहभाग, या सोहळ्यासाठी राज्यभरातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमाची तयारी युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या नियोजनात जोमात सुरू आहे.

शुक्रवार दि.५ जून २०२६ दु.३.३० वा.राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधीस



अभिवादन करुन शिवराज्याभिषेक सोहळ्यास प्रारंभ (जिजाऊ समाधी स्थळ, पाचाड), दु.४ वा. युवराज संभाजी महाराज व युवराजकुमार शहजीराजे छत्रपती यांचे भव्य स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ (स्थळ : नाणे दरवाजा), दु.४.१५ वा. गडपूजन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या उपस्थितीत, (स्थळ : नगारखाना) दुपारी ०४.३० वा. - युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या हस्ते 'धार तलवारीची.. युद्धकला महाराष्ट्राची... युद्धकलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ (स्थळः होळीचा माळ), सायं. ०७.०० वा. ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर. (स्थळः होळीथा माळ), रात्री ०८.०० वा. - जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा... (स्थळः राजसदर), रात्री ०१.०० वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (स्थळः शिरकाई मंदिर), रात्री ०९.३० वा. - वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन (स्थळः अगदीश्वर मंदिर),

शनिवार, दि. ६ जून २०२६ सकाळी ०७.०० वा. - युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे शुभहस्ते पारंपारिक वाद्यांच्या गजरात ध्वजपूजन व ध्वजारोहण (स्थळः नगारखाना), सकाळी ०७.३० वा. शाहिरी कार्यक्रम (स्थळः राजसदर), सकाळी ०९.३० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राजसदरेवर आगमन, सकाळी ०९.५० वा. - युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे राजसदरेवर आगमन, सकाळी १०.०० वा. - युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या शुभहस्ते श्री शिवछत्रपती महाराजांच्या उत्सवमूर्तीस अभिषेक, सकाळी १०.२० वा. - श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारूढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक, सकाळी १०.३० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांचे शिवभक्तांना संबोधन, सकाळी ११.०० वा. 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा शिवराज्याभिषेक' पालखी सोहळ्यास प्रारंभ, दुपारी १२.०० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे जगदीश्वर मंदिर येथे आगमन, दुपारी १२:१५ वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायास पंढरीच्या वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान (स्थळः जगदीश्वर मंदिर), दुपारी १२.२५ वा. - श्री शिवछत्रपती महाराजांच्या समाधीस अभिवादन.... असे कार्यक्रम होतील. तरी या ऐतिहासिक सोहळ्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील मावळ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य शिवव्याख्याते ओंकार व्यवहारे यांनी केले आहे.

### नृत्यकलेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल

# ऋग्वेदा रोडे हिला 'राष्ट्रीय कलारत्न' पुरस्कार जाहीर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नृत्य, अभिनय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कु. ऋग्वेदा वर्षा सचिन रोडे हिला बालगटातील प्रतिष्ठेचा 'राष्ट्रीय कलारत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार १६ ऑगस्ट रोजी शिर्डी येथे विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या वतीने आयोजित 'साहित्य संस्कृती संगम संमेलन' मध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

ऋग्वेदा ही अहिल्यानगर आकाशवाणी केंद्रातील नैमित्तिक उद्घोषिका प्रा. सौ. वर्षा पाठक रोडे यांची कन्या असून ती टायनी टॉट्स शाळेची विद्यार्थिनी आहे. लहान वयातच तिने विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग घेत आपल्या कलागुणांची छाप उमटविली आहे. तिच्या नृत्यकलेतील सातत्यपूर्ण यशाची दखल घेत हा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान जाहिर करण्यात आला आहे.

ऋग्वेदा ही नृत्य झंकार अकॅडमीची विद्यार्थिनी असून अकॅडमीच्या संचालिका प्रिया ओगले यांच्या मार्गदर्शनाखाली तिने विविध ग्रुप डान्स स्पर्धांमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविला आहे. तिच्या सादरीकरणांनी अनेक कार्यक्रमांमध्ये रसिकांची दाद मिळविली असून नृत्यकलेबरोबरच अभिनय क्षेत्रातही तिने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

गेल्या वर्षी ज्येष्ठ रंगकर्मी प्रविण भारदे यांच्या तीन नाटकांमध्ये ऋग्वेदाने भूमिका साकारल्या होत्या. या नाटकांमध्ये तिला ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे आणि प्रविण भारदे यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. तसेच अखिल भारतीय नाट्य संमेलनात तिचा सहभाग राहिला होता, ज्यामुळे तिच्या कलात्मक व्यक्तिमत्त्वाला अधिक व्यापक व्यासपीठ लाभले.

# इरादा पक्का, हौसला बुलंद आणि मेहनत करण्याची तयारी असेल, तर प्रत्येक गोष्ट शक्य आहे - सीए डॉ. अशोककुमारजी पगारिया




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आनंदधाम येथे दहावी व बारावी च्या सकल जैन समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह व करियर गायडन्स कार्यक्रमात शेकडो विद्यार्थी, पालकांचा मोठ्या संख्येत सहभाग झाला. आ आचार्य भगवंत श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने तसेच महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य श्री कुंदनऋषीजी महाराज, प्रबुद्ध विचारक श्री आदर्श ऋषीजी महाराजांच्या सत प्रेरणेने वीर सेना व श्री तिलोक रत्न जैन स्था. परीक्षा बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीआलोकऋषिजी म. यांनी मंगलाचरण, नवकार मंत्राचा जप ,आनंद धूनचाजप केला. कुमारी दिया गांधी यांनी डॉ अशोकजी पगारिया यांचा बायोडाटा वाचून दाखवला, तसेच सर्वांचे स्वागत केले.

सीए डॉ अशोककुमारजी पगारिया यांनी सांगितले की मनात जे कोणतेही करिअर ठरवाल आणि ते मिळवण्यासाठी कठोर परिश्रम कराल, तर तुमचे ध्येय निश्चितच साध्य होऊ शकते. आता तुम्ही कोणतेही करिअर निवडा, त्यासाठी इतकी मेहनत करा, इतका अभ्यास करा की तुमचे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल.

ज्या क्षेत्रात तुम्हाला रुची आहे, ज्या गोष्टीची तुम्हाला आवड आहे, त्याच अभ्यासक्रमाची निवड करणे तुमच्या यशासाठी अधिक उपयुक्त ठरेल. कारण त्या अभ्यासक्रमाचा अभ्यास तुम्ही मनापासून, आवडीने आणि सातत्याने कराल आणि यश संपादन कराल.

विज्ञान शाखेत डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर कायदा, वकिली, पायलट अशा अनेक करिअरच्या संधी तुमच्या पात्रतेनुसार उपलब्ध आहेत.

वाणिज्य शाखेत सीए, सीएस, कॉस्ट अकाउंटंट, एमबीए, सीएफए, एलएलबी, फॉरेन्सिक अकाउंटिंग व ऑडिटिंग यांसारख्या संधी उपलब्ध आहेत.

कला शाखेत बी.ए., एम.ए., एलएलबी तसेच यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षा देऊन प्रशासकीय अधिकारी बनता येते. तसेच परदेशी भाषा पदवी अभ्यासक्रम, पायलट, एअर होस्टेस, चित्रपट अभिनेता, दिग्दर्शक यांसाठीही विविध डिप्लोमा व पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

तुम्ही कोणतेही करिअर निवडा, ते साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि बुलंद हौसला आवश्यक आहे.

एका शायरने अगदी योग्य म्हटले आहे

'' मंजिले उन्हींको मिलती है, जिनके सपनों में जान होती है उड़ान केवल पंखोंसे नहीं दोस्तों , हौंसलों से होती है ''

श्री आलोकऋषीजी महाराज साहेबांनी युवा वर्गाला तीन गोष्टी लक्षात ठेवायला सांगितल्या. संस्कार , संघटन आणि सेवा. त्यांनी सांगितले.

जहा संघटन होता है ,वहा शक्ती होती है
जहा सेवा होती है वहा श्रद्धा होती है और
जहा धर्म होता है ,वहा मानता का कल्याण होता है

डॉक्टर अशोक जी पगारिया , श्री सचिनजी डागा पत्रकार पंकजजी गुंदेचा , दीपकजी कासवा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री रतिलालजी कटारिया, श्री संतोषजी गांधी , मदनजी मुनोत तसेच लता बोरा , मनिषा मुनोत ,सुशिला बाफना इत्यादींची यांची विशेष उपस्थिती होती. दहावी व बारावी विशेष गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी *जैन विश्व* या वेबसाईटचे विमोचन व *वीर सेना* लोगोचे विमोचन महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज साहेब यांच्या सानिध्यात झाले. श्री यश चोरडिया, अथर्व पिपाडा, रियागांधी , दिया गांधी,अंकुश चव्हाण , स्वराज गांधी इत्यादींनी कार्यक्रमाला यशस्वी बनवण्यासाठी खूप मदत केली.

# जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यासाठी बजाज परिवारातर्फे १ लाख ५६ हजारांची आर्थिक मदत

## समाजातील गरजूंना सन्मानाने जीवन जगता आले पाहिजे : योगेश बजाज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** साधूसंतांची भूमी असलेल्या अहिल्यानगरला निस्वार्थी भावनेने समाजासाठी कार्य करणारांची मोठी परंपरा आहे. समाजातील गरजूंना सातत्याने मदतीचा हात देऊन कार्य करणाऱ्या संस्थांमध्ये जैन वात्सल्य संस्था अग्रेसर आहे. गरजूंना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी संस्था अखंड योगदान देत आहे. अशा कार्यामुळे खऱ्या अर्थाने संतांची शिकवण अंमलात येत असते. या संस्थेच्या कार्यात योगदान देताना मनापासून आनंद मिळतो. आज आमचा परिवार पुण्यात स्थायिक झाला असला तरी नगरच्या मातीशी असलेले ऋणानुबंध कायम आहेत, अशा भावना योगेश प्रकाश बजाज (पुणे) यांनी व्यक्त केल्या.

मूळचे नगरचे व सध्या पुणे येथे स्थायिक झालेले योगेश प्रकाश बजाज परिवारातर्फे नगरमधील जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यासाठी १ लाख ५६ हजार रूपयांची आर्थिक मदत नुकतीच करण्यात आली. यावेळी दीपा योगेश बजाज, मिहिका योगेश बजाज उपस्थित होत्या. या देणगी बद्दल बजाज परिवाराचा सत्कार करण्यात आला. यावेळी जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय प्रमुख मार्गदर्शक अशोक (बाबूशेठ) बोरा, जैन वात्सल्य संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, मोहनलाल मानधना, अमृत मुथा, ईश्वर बोरा, विनित बोरा आदी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा म्हणाले की, कर्तृत्वाला दातृत्वाची जोड मिळाली तर समाजासाठी भरीव कार्य करता येते. प्रत्येकाने समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जैन वात्सल्य संस्था समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने गरजूंसाठी विविध उपक्रम राबवित आहे. दर महिन्याला गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वितरित करण्यात येते. हा सामाजिक उपक्रम निरंतर चालू आहे. पुण्यात स्थायिक झालेल्या बजाज परिवाराने आपल्या मातीशी जुळलेली नाळ कायम राखत संस्थेच्या कार्यासाठी भरीव आर्थिक मदत केली आहे. अशा दातृत्वाची आज खरी गरज आहे. शेवटी ईश्वर बोरा यांनी आभार मानले.

(पान १ वरून)

## छत्रपती संभाजीनगरमधील खून प्रकरणातील आरोपींना नेवासा पोलिसांकडून अटक

ओम प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर) ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सिडको पोलीस स्टेशन (जिल्हा छत्रपती संभाजीनगर) यांच्या पथकाच्या स्वाधीन करण्यात आले असून, या गुन्ह्याचा पुढील तपास सिडको पोलीस करत आहेत. सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. एम. सुदर्शन साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे साहेब*, श्री. वैभव कलुबर्मे साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी शेवगाव उपविभाग श्री. निरज राजगुरु साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनांनुसार करण्यात आली. या कारवाईत नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले, पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील पोलीस अंमलदार संतोष शिंदे नारायण डमाळे अतुल शेळके भारत बोडखे आणि महिला पोलीस अंमलदार **वर्षा कांबळे यांच्या पथकाने मोलाची भूमिका बजावली. नेवासा पोलिसांच्या या जलद कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## झाडे पडली, तारा तुटल्या, वीज गायब, घरांचे नुकसान

बाजूला काढण्याचे काम सुरू केले. रात्रीच्या वादळी वाऱ्यामुळे रात्रभर वीजपुरवठा खंडित झाल्याने अनेकांना त्रास सहन करावा लागला. फकीरवाडा गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड वरील असंख्य कॉलनीतील झाडे रस्त्यात पडल्याने वाहतूक ठप्प झाली होती.

## गुन्हेगारी मोडीत काढणार, चांगल्या कामांना प्राधान्य देणार- विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे

समाजातील चांगल्या उपक्रमांना आणि प्रामाणिक नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून नेहमीच पूर्ण सहकार्य आणि प्रोत्साहन मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस-पत्रकार समन्वय: केंद्रीय पत्रकार संघाने केलेल्या या सन्मानाबद्दल आयजी येनपुरे यांनी आभार मानले. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेने समाजातील वास्तव प्रशासनासमोर आणावे, जेणेकरून गुन्हेगारीमुक्त समाज निर्माण करणे सोपे होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आयजी संजय येनपुरे यांच्या धडाकेबाज आणि संवेदनशील नेतृत्वामुळे नाशिक विभागात गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून, सर्वसामान्यांमध्ये सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत आहे. केंद्रीय पत्रकार संघाचा हा सन्मान त्यांच्या याच जनहितैषी कार्याची पावती आहे.

## मनपाच्या सार्वजनिक मालमत्ता गहाण न ठेवता नगरसेवक-अधिकाऱ्यांच्या मालमत्ता गहाण घ्या - किरण काळे

पाणीपुरवठा होत असून अनेक नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

किरण काळे यांनी जागतिक बँकेच्या निदर्शनास आणून दिले आहे की, फेज-२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांना अद्याप पूर्णता प्रमाणपत्रे ( ) मिळालेली नाहीत. त्यामुळे संबंधित कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत का, प्रकल्पांचे उद्दिष्ट साध्य झाले आहे का आणि सार्वजनिक निधीचा कार्यक्षम वापर झाला आहे का, याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.

ते अमरधामा ही गहाण ठेवतील -

कर्ज तारणासह की तारणा शिवाय हे अद्याप निश्चित झालेले नाही. जर जागतिक बँकेने तारण मागितले तर मनपा काय काय देऊ शकते यावरती खल सुरू असल्याचा दावा किरण काळे यांनी केला आहे. काळेंनी दावा केला आहे की, त्याकरिता महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, जुने मनपा कार्यालय इमारत, प्रभाग कार्यालये, ओपन स्पेस, उद्याने, पिंपळगाव माळवी येथील सुमारे सातशे एकर भुखंड या सह मनपाच्या स्थावर मालमत्तेचे तपशील गोळा केले जात आहेत. अशा पद्धतीने जनतेच्या मालकीची मनपाची संपत्ती गहाण ठेवण्याचा राजकीय नेते, लोकप्रतिनिधींना कोणताही अधिकार नाही. राजकीय दबावातून प्रशासनाने ही ते पाप करू नये. आपल्या राजकीय कार्यकर्त्यांसाठी थेट स्मशानभूमीत ताबेमाती करून अनधिकृत गाळे बांधणारे सत्ताधारी वेळ पडली तर उद्या अमरधाम देखील गहाण ठेवायला मागे पुढे पाहणार नाहीत. तसे झाले तर नगरकरांना मरणानंतर सुखा सुखी मोक्ष सुद्धा मिळू शकणार नाही, असा सणसणीत टोला किरण काळे यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला आहे.

## गोदावरी–कृष्णा खोरे कार्यालय स्थलांतराला कर्मचाऱ्यांचा तीव्र विरोध

स्थलांतरास विरोध दर्शविला आहे. अहिल्यानगर पाटबंधारे विभाग सन १९३० पासून अहिल्यानगर मुख्यालयात कार्यरत असून त्याचे लोणी (ता. राहाता) येथे स्थलांतर प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच सन १९७२ पासून कार्यरत असलेल्या मुळा पाटबंधारे विभागाचे मुख्यालय राहुरी येथे हलविण्याचा प्रस्ताव आहे.

या दोन्ही विभागीय कार्यालयांचे कामकाज जिल्हास्तरावरील प्रशासकीय नियंत्रणाशी संबंधित आहे. विभागांच्या कार्यक्षेत्रात उपविभागीय व शाखास्तरीय कार्यालये कार्यरत असल्यामुळे विविध तालुक्यांतील लाभधारक, शेतकरी व कर्मचारी यांच्यासाठी अहिल्यानगर मुख्यालय अधिक सोयीचे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

याशिवाय मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, पुणे यांचे कार्यालय कोल्हापूर येथे, मुख्य अभियंता (विप्र) जलसंपदा विभाग, पुणे यांचे कार्यालय सोलापूर येथे आणि मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, संभाजीनगर यांचे कार्यालय नांदेड येथे स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील प्रत्येक प्रादेशिक विभागाच्या मुख्यालयातच मुख्य अभियंता कार्यालय कार्यरत असणे प्रशासकीय दृष्ट्या अधिक उपयुक्त असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. आजपर्यंत ही कार्यालये जिल्हास्तरावर नव्हती. त्यामुळे संबंधित प्रदेशातील सर्व जिल्ह्यांचा विचार करता प्रादेशिक मुख्यालयातच ही कार्यालये राहणे अधिक सोयीस्कर व परिणामकारक ठरेल, असा दावा करण्यात आला.

कार्यालयांचे स्थलांतर झाल्यास त्या ठिकाणी रिक्त होणाऱ्या जागांवर खाजगी संस्थांकडून अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीतीही संघटनेने व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासकीय, सामाजिक व सार्वजनिक हिताचा विचार करून प्रस्तावित स्थलांतर तातडीने रद्द करण्यात यावे आणि संबंधित विभागांना आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. आंदोलनकर्त्यांनी शासनाने हा निर्णय पुनर्विचार करून कार्यालये मूळ ठिकाणीच कायम ठेवावीत, अशी एकमुखी मागणी केली.